| Education Office<br>Zilla Parishad (Secondary)<br>Chelipura Highschool,<br>Station Road,<br>Chhatrapati Sambhaji Nagar-431001 | सत्यमेव जयते<br>महाराष्ट्र शासन | शिक्षणाधिकारी कार्यालय<br>जिल्हा परिषद<br>(माध्यमिक विभाग)<br>चेलीपुरा हायस्कुल, स्टेशन रोड,<br>छत्रपती संभाजीनगर-४३१००१ | |
|---|---|---|---|

दुरध्वनी : (0240) 2348564 e-mail: rmsaaurangabad@gmail.com

जा.क्र.जिपऔ/शि/मावि-६/२०२३-२४/2351 दिनांकः- 06/03/2024

**अल्पसंख्यांक संस्था**

प्रति,

**मुख्याध्यापक,**
**सहारा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित**
**माध्यमिक विद्यालय, मुकूंदवाडी नवीन वसाहत**
**मुकूंदवाडी, छत्रपती संभाजीनगर**

**विषय : श्रीमती गायकवाड श्वेता राजेश (बी.ए.,बी.एड. इंग्रजी/इतिहास (CTET) नियुक्ती गट इयत्ता ८ वी) यांना दिनांक २०.०२.२०२४ पासून दोन वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी अंशतः अनुदानित तत्वावर रुपये एस १४: ३८६००-१२२८०० या वेतनस्तरावर सहशिक्षक म्हणून केलेल्या नियुक्तीस वैयक्तिक मान्यता मिळणेबाबत...**

संदर्भः १) शासन निर्णय, क्रमांक-एसएसएन-१००७(३६/०७)/माशि-२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१२
२) शासन निर्णय क्रमांकः एसएसएन-२०१४(१/१४)/टीएनटी-२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई दिनांक २० जून, २०१४
३) शासन निर्णय क्रमांकःएसएसएन-२०१५/प्र.क्र.२०/१५/टिएनटी-२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई दिनांक १३ जुलै, २०१६
४) शासन निर्णय क्रमांक एसएसएन-२०१६/प्र.क्र.३०/टीएनटी-१ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई दिनांक २४ ऑगस्ट, २०१८
५) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१८/प्र.क्र.३९७/टीएनटी-१ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई दिनांक ०७ फेब्रुवारी, २०१९ व १२ जून, २०१९
६) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र.शालार्थ-११८/प्र.क्र.३०/टीएनटी-३ दि.१०.६.२०२२
७) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.२६०/टिएनटी-१दि.७.२.२०२३
८) शासन पत्र क्रमांक :न्यायाप्र २०२२/प्र.क्र.३९५/टिएनटि-१ दिनांक ९.१२.२०२२
९) शासन पत्र क्रमांक :संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१४/टिएनटि-१ दिनांक ०२.०२.२०२३
१०) मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय, मुकूंदवाडी, नवीन वसाहत मुकूंदवाडी, छत्रपती संभाजीनगर यांचा प्रस्ताव दिनांक २०.०२.२०२४ प्राप्त दिनांक ४.३.२०२४

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविण्यात येते की, सहारा शिक्षण प्रसारक मंडळ या अल्पसंख्याक संस्था संचालित माध्यमिक विद्यालय, मुकूंदवाडी, नवीन वसाहत मुकूंदवाडी, छत्रपती संभाजीनगर या माध्यमिक शाळेतील सहशिक्षक श्री विलास शंकर मुंढे यांची संस्था संचालित कै.गणपतराव पाटील प्राथमिक विद्यामंदिर, मुकूंदवाडी, छत्रपती संभाजीनगर या शाळेत अंशतः अनुदानावरुन पूर्णतः अनुदानावर दिनांक १३.१.२०२४ पासून बदली झाल्यामुळे शाळेतील अंशतः अनुदान तत्वावरील सहशिक्षकाचे पद रिक्त झालेले आहे.

सहशिक्षकाच्या रिक्त झालेल्या पदावर शाळा/संस्थेने श्रीमती गायकवाड श्वेता राजेश (बी.ए.,बी.एड. इंग्रजी/इतिहास (CTET) नियुक्ती गट इयत्ता ८ वी) यांना दिनांक २०.०२.२०२४ पासून दोन वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी अंशतः अनुदानित तत्वावर रुपये एस १४: ३८६००-१२२८०० या वेतनस्तरावर सहशिक्षक म्हणून केलेल्या नियुक्तीस वैयक्तिक मान्यता मिळण्यासाठी संदर्भीय पत्र क्रमांक १० अन्वये प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला आहे.

शासन निर्णय क्रमांक एसएसएन-२०१५/प्र.क्र.२०/१५/टीएनटी-२/ दिनांक १३.७.२०१६ व शासन शुद्धीपत्रक दिनांक २७.१०.२०१६ अन्वये अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांच्या शाळांमध्ये शिक्षकांची पद भरती, वैयक्तिक मान्यता याबाबत कार्यपद्धती विहित करण्यात आलेली आहे.

सहारा शिक्षण प्रसारक मंडळ, ही संस्था अल्पसंख्याक संस्था असून मा.सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे प्रमाणपत्र क्रमांकः अशैसं-२०१०/प्र.क्र.१००/२०१०/का.५ दिनांक १० फेब्रुवारी, २०११ अन्वये अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

संस्थेने दैनिक सकाळ छत्रपती संभाजीनगर या वृत्तपत्रातून दिनांक ८ डिसेंबर, २०२३ रोजी जाहीरात देवून दिनांक १०.१२.२०२३ रोजी मुलाखती घेतलेल्या आहेत.

प्रस्तावासोबत मुख्याध्यापक व संस्थेने दिलेल्या प्रमाणपत्रानुसार व वेळापत्रकानुसार माध्यमिक विद्यालय मुकूंदवाडी, छत्रपती संभाजीनगर या माध्यमिक शाळेस सन २०२२-२३ च्या संच मान्यतेनुसार अंशतः अनुदान तत्वावर मुख्याध्यापक-१, इ.९-१०वी-५, इ.८वी-४ या प्रमाणे अंशतः अनुदान तत्वावर १० पदे मंजुर आहेत.

संबंधिताची नियुक्ती शाळा/संस्थेने इयत्ता ८ वी या गटासाठी केलेली असून संबंधिताने केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा इ.६वी ते ८ वी (CTET) जानेवारी २०२४ उत्तीर्ण केलेली आहे.

संस्था/शाळेने सादर केलेल्या शिफारशीनुसार तसेच सादर केलेल्या माहितीनुसार खालील कर्मचाऱ्याच्या नेमणूकीस तात्पुरती मान्यता देण्यात येत आहे. सदर नेमणुक निर्वाद पदावरील असल्याचे प्रमाणित केले आहे. तसेच सदरील नेमणूक न्यायप्रविष्ठ नाहीत असेही आपण प्रमाणित केले आहे. वर नमुद केलेली माहिती, संस्था अल्पसंख्याक असल्याचे प्रमाणपत्र व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मध्ये नमुद केलेली कार्यपद्धतीच्या अधीन राहून खाली नमुद केलेल्या शिक्षण सेवकास वैयक्तिक मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ क्र | शिक्षक कर्मचाऱ्याचे नाव | संवर्ग | पदनाम | शैक्षणिक पात्रता | वेतन श्रेणी | मान्यता कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती गायकवाड श्वेता राजेश | खुला | सहशिक्षक | बी.ए., बी.एड. इंग्रजी/ इतिहास नियुक्ती गट (इ.८वी) (CTET) | एसः१४ ३८६००-१२२८०० | शाळेतील सहशिक्षक श्री विलास शंकर मुंढे यांची संस्था संचालित कै.गणपतराव पाटील प्राथमिक विद्यामंदिर, मुकूंदवाडी, छत्रपती संभाजीनगर या शाळेत अंशतः अनुदानावरुन पूर्णतः अनुदानावर दिनांक १३.१.२०२४ पासून बदली झाल्यामुळे शाळेतील अंशतः अनुदान तत्वावरील सहशिक्षकाचे पद रिक्त झालेले आहे.<br>रिक्त झालेल्या सहशिक्षक पदावर शाळा/संस्थेने सादर केलेल्या माहितीनुसार व केलेल्या शिफारशीनुसार शासन निर्णय दिनांक १३.७.२०१६ मधील विहित केलेली कार्यपद्धती, शासन पत्र क्रमांकःन्यायाप्र २०२२/प्र.क्र.३९५/टिएनटि-१ दिनांक ९.१२.२०२२, व शासन पत्र क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र. १४/टिएनटि-१ दिनांक २.२.२०२३ नुसार श्रीमती गायकवाड श्वेता राजेश (बी.ए.,बी.एड. इंग्रजी/ इतिहास नियुक्ती गट इयत्ता ८वी) यांना अंशतः अनुदान तत्वावर दिनांक २०.०२.२०२४ पासून दोन वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी एसः१४ ३८६००-१२२८०० या वेतनस्तरमध्ये शाळा/संस्थेने केलेल्या नियुक्तीस वैयक्तिक मान्यता प्रदान करण्यात येते. |

**टिप :- प्रस्तावातील चुकीच्या माहितीमुळे अथवा इतर कारणाने नियुक्ती चुकीची असल्याचे आढळून आल्यास कोणत्याही क्षणी रद्द होण्यास पात्र असेल.**

**(मधुकर देशमुख)**
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर

प्रत :- १) अधिक्षक, वेतन व भ.नि.निधी पथक (माध्य.) छत्रपती संभाजीनगर यांना माहिती व कार्यवाहीस्तव देण्यात येते.
२) लेखाधिकारी (शिक्षण) छत्रपती संभाजीनगर, यांना पुढील कार्यवाहीस्तव.
३) संबंधितास मुख्याध्यापक यांच्या मार्फत.